ॐ

# अध्याय चौदावा

१ ‘‘सर्व ज्ञानामधें अर्जुना, परमोत्तम जें ज्ञान
सांगें तूतें पुन्हां ऐक तें’’ बोले श्रीभगवान १

‘‘जाणुनियां जें सुटले सहजें देह-बंधनांतून
ते सर्व मुनी देही असुनी मोक्ष पावले पूर्ण २

२ ह्या ज्ञानाच्या बळें सर्वथा मम साधर्म्या आले
जगें जाहलीं आणि निमालीं परी अढळ ते झाले ३

सत्य नित्य मी शुद्ध बुद्ध मी जसा अनंतानंद
सर्वत्र असें, जाण ते असे तयां न मजसी भेद ४

३ मूल-प्रकृति क्षेत्र भारता, तिथे पेरितों बीज
भूतोत्पत्ति तदा किरीटी, त्यांतुनि होते सहज ५

४ ज्या ज्या मूर्ती जन्म पावती जगीं सर्व योनींत
बीज पेरिता पिता मी तयां माता प्रकृती तेथ ६

५ सत्त्व रज तम त्रि-गुण जन्मती प्रकृतिपासुनी येथ
ते चि पांडवा, अव्यय जीवा गुंतविती देहांत ७
क्षेत्र-ज्ञ तदा गुंतुनी गुणीं ‘मी देह’ असें मानी
धरुनि अहंता होय सर्वथा क्षेत्राचा अभिमानी ८
६ त्यांत सत्त्व तें निर्मळ देतें स्वास्थ्य आणखीं ज्ञान
क्षेत्रज्ञातें ज्ञान-शृंखला सुदृढ अशी घालून ९
ज्ञान-बंधनीं जीव गुंतुनी धरी अहंता चित्तीं
‘मी चि ज्ञाता सुखी सर्वथा’ ही सत्त्व-गुणापत्ति १०
७ असे वासना-रूप अर्जुना, तृष्णा-मूलक रज तें
आसक्ति-बळें कर्म-बंधनीं घाली जीवात्म्यातें ११
८ तम सर्वांतें मोह घालितें अज्ञान चि तें निरुतें
आळस-निद्रा-प्रमाद-पाशीं गुंतवितें जीवातें १२
९ सत्त्व घालितें सुखीं रज हि तें घडवी कर्मासक्ति
परंतु तम तें ज्ञान झांकुनी करी प्रमादीं निरति १३
१० रज-तम दोन्ही पूर्ण जिंकुनी सत्त्व बळावे येथें
सत्त्व-तमातें जिंकुनि निरुतें पार्था, प्रबळे रज तें १४
जाण तमातें बळ तें चढतें जिंकुनि सत्त्व-रजातें
पार्था, पाहें असे त्रि-गुण हे दर्शित केले तूतें १५
११ पसरे प्रज्ञा-प्रकाश देहीं सर्व इंद्रिय-द्वारा
सर्वत्र तदा तो जाणावा पार्था, सत्त्व पसारा १६

सत्त्व वाढतां विषय सर्वथा नावडती चित्तातें
स्वस्थता मना आणि वासना अंतरांत एकवटे १७

वृत्ति फांकते ज्ञानीं रमते प्रज्ञा सच्छास्त्रांत
सर्व इंद्रियें पाळिती स्वयें नियम सर्वथा विहित १८

१२ लोभ अ-शांति स्पृहा प्रवृत्ती कर्मारंभ तसा च
उठती देहीं जाण सर्व हीं रजो-वृद्धि होतांच १९

न च संतोषी मन अभिलाषी पर-द्रव्य पर-दारा
वाटे जीवा सदा असावा अचाट कर्म-पसारा २०

१३ आणिक वाढे तम चहूंकडे तदा शरीरीं जाण
उठती मोह प्रमाद पार्था, अप्रवृत्ति अज्ञान २१

असे मूढता म्हणुनी चित्ता दुष्कृतींत उल्हास
अंतःकरणीं स्फूर्ति-हीनता पसरी अविवेकास २२

१४ प्रयाण-कालीं पार्था, देहीं सत्त्व वाढलें ज्याच्या
जन्म पावतो शुभ-लोकीं तो समागमीं ज्ञात्यांच्या २३

१५ देह ठेवुनी जाय रजाची वाढ जाहली असतां
जन्म मानुषी योनींत तया समीप कर्मासक्तां २४

बुडुनी गेला तमीं तयाला जन्म मूढ-योनींत
तो पशु पक्षी कृमि कीटक वा वृक्ष होय निभ्रांत २५

१६ सत्कर्माचें म्हणती फळ तें सात्त्विक निर्मळ साचें
दुःख रजाचें ज्ञान-शून्यता फल तामस कर्माचें २६

१७ सत्त्वांतुनि तें ज्ञान निपजतें रज कारण लोभातें
प्रमाद-मोह-ज्ञानशून्यता ह्यांतें कारण तम तें २७

१८ सात्त्विक वृत्ती धरुनी चित्तीं देह ठेविती जगतीं
जाण निश्चतीं त्यां उर्ध्व-गती स्वर्ग-लोक-संप्राप्ति २८

रजोगुणी जे तयांसि सहजें मध्यें चि घडे वस्ती
कर्मासक्ती धरुनी चित्तीं ते संसारीं येती २९

हीन गुणांनीं युक्त होउनी अधोगतीतें जाती
तामस जन ते घडे तयांतें अंतीं नरकीं वस्ती ३०

१९ गुणांवांचुनी अन्य न कोणी करी कर्म-विस्तार
जाणे ज्ञाता असा तत्त्वतां हा त्रि-गुण-व्यवहार ३१

आणि ओळखे स्व-रूप देखे त्रि-गुणातीत अलिप्त
उर्ध्व-पथें मद्रूप होउनी राहे साक्षीभूत ३२

ज्ञान-जागृती होता लोपे अहं-ममत्व-स्वप्न
तदा सर्वथा होई ज्ञाता आत्म-रूप-संपन्न ३३

२० ओलांडुनियां असे त्रि-गुण हे इथे देह-संभूत
ब्रह्म-रूप तो ज्ञाता होतो सहजें जीवन्मुक्त ३४

चंद्र-नभींचा बिंबे साचा जळीं परंतु अलिप्त
असे पांडवा, आत्म-ज्ञ तसा तो अलिप्त देहांत ३५

आणि अर्जुना, देह-भावना समूळ लोपे त्याची
म्हणुनि सर्वथा न च तया व्यथा जन्म-जरा-मरणाची !'' ३६

२१ तुष्ट मानसें तैं पार्थ पुसे, ''षड्‌गुणेश्वरा देवा,
त्रि-गुणातीत ज्ञाता बरवा कसा इथे जाणावा ? ३७
लोकीं वागे कसा निजांगें ? कसा निस्तरे त्रि-गुण ?
सकृप होउनी तें चि विवरुनी सांगा मज संपूर्ण.'' ३८
२२ अशी विनंती परिसुनि चित्तीं त्रि-विक्रम सुखें डोले
बोले, ''पार्था, कथितों आतां ऐक तुवां जें पुसिलें. ३९
सहजें ज्ञान-प्रवृत्ति-मोह स्वभाव-गुण-कार्यांस
पावतां तरी खेद न च करी, न तरी न धरी आस. ४०
सायंप्रातर्माध्याह्नाची गणना न करी सविता
तेविं तो मुनी त्रि-गुणां न गणी असुनि गुणीं त्यापरता ४१
२३ जेविं मृग-जळें न चळे न ढळे धरणी-धर अणुमात्र
तेविं त्रि-गुणीं अंतःकरणीं न च हाले सर्वत्र ४२
दुरून पाहे कसे त्रि-गुण हे खेळ खेळती येथें
सहजें जाणे आत्म-तत्त्व तें राहे त्रिगुणांपरतें ४३
पवन उठे ना खुटे पांडवा, तरि तें गगन निवांत
आले गेले गुण न च डोले तसा असे तो शांत ४४
२४ सदा स्व-रूपीं निमग्न म्हणुनी आत्म-रूप जग झालें
सोनें-माती एक चि होती तया द्वैत तें नुरलें ४५
असो निद्रितासन्निध पार्था, सर्प ऊर्वशी अथवा
तेविं सर्वतोपरी लेखितो सम तो देहीं द्वन्द्वा ४६

सुख-दुःख स्तुति-निंदा पाहे प्रियाप्रिय हि सम-भावें
धैर्यवंत तो स्व-स्थ राहतों न च अस्थिरता पावे ४७

२५ समान मानापमान मानी समान शत्रू-मित्र
निश्चल राहे विश्वीं पाहे आत्म-रूप सर्वत्र ४८
होतां ब्रह्मावबोध कर्मारंभ खुंटला ज्याचा
जाण अर्जुना, तो चि त्रिगुणातीत बोलिला साचा ४९

२६ भजे मज जरी अव्यभिचारी भक्ति-योग साधून
तरी चि नर तो ब्रह्म पावतो त्रिगुणां उल्लंघून ५०
ज्वाला-वह्नी तरंग-पाणी कंकण आणि सुवर्ण
किरण आणि रवि एक चि तेवीं विश्व आणि मी जाण ! ५१
अशा मज इथे जाणुनि निरुतें अभेद-भावें जगतीं
मी चि होउनी मज भजणें ही अव्यभिचारी भक्ति ५२
जैं उल्हासे अशी समरसें ज्ञान-दृष्टि संपूर्ण
'भक्ति' एकली ती चि मानिली सायुज्याची खूण ५३
'ज्ञान' हि पार्था, तें चि सर्वथा 'योगा' चें सर्वस्व
तिथे निश्चितीं एक चि होती भक्त आणखीं देव ! ५४

२७ पर-ब्रह्म मी अविनाशी मी मोक्ष-स्थिति साचार
आत्यंतिक तें सुख मी चि असें शाश्वत धर्माधार'' ५५

गुण-त्रय-विभागाचें असे ज्यांत निवेदन ।
तो चि भावार्थ गीतेचा हा अध्याय चतुर्दश ॥ १४ ॥